# लहरी ज्ञानामृत

## हिन्दी मराठी भाग १ ला

लेखक :
संत जैरामदास उर्फ लहरी बाबा



॥ श्री गुरूदेव प्रसन्न ॥

श्री संत जैरामदास उर्फ लहरीबाबा
द्वारा लिखीत



# लहरी ज्ञानामृत

## हिन्दी मराठी भजनावली भाग १ला

द्वितीय आवृत्ती
- प्रकाशन तिथी -
जन्म सप्ताह समारोह (२००४)

■ **लहरी ज्ञानामृत**
**मराठी हिन्दी भजनावली भाग १ ला**

■ **प्रकाशक**
श्री. लहरी आश्रम कामठा,
जि. गोंदिया

© **श्री. लहरी आश्रम कामठा**

■ **द्वितीय आवृत्ती**
प्रती- ५००

■ **प्रकाशन तिथी**
जन्म सप्ताह समारोह, २००४
लहरी आश्रम, कामठा.

■ **अक्षर जुळवणी**
संजय तराळ
संविस कॉम्प्यूटर्स, अमरावती

■ **मुद्रक**
न्यु पंचशील ऑफसेट, गांधीचौक,
अमरावती.

■ **पुस्तक मिळण्याचे स्थान**
लहरी आश्रम कामठा
ता.जि. गोंदिया

■ **मूल्य : रूपये १०/-**

## – दोन शब्द –

प्रिय बांधवानों !

जगात प्रत्येक माणसाला सुखच हवे, मुंगी पासून ब्रह्मदेवाला देखील विचारले की तुम्हाला सुख हवे की दु:ख तर ते सुखच मागतील. पण धन दौलत, ऐश्वर्य सुखाचे साधन आहेत काय? नाही ! कारण हे आनन्द अखंड स्वरूपाचे नसते. आपल्याला सर्व इहलौकिक सुख मिळाल्यावर ही शांती मिळत नाही, उलट अजून लोभ वाढतच जातो. एकच वस्तु एका वेळेस सुख व दुसऱ्या वेळेस दु:ख देऊ शकते व त्यानी एकाला सुख व दुसऱ्याला दु:ख मिळू शकते तर सांसरिक वस्तु अनित्य आहेत. म्हणून शेवटी अशी स्थिती येते की मनुष्य अखंड स्वरूपाच्या सुखाकरीता धडपड करतो. हे सुख त्याला, परमेश्वराच्या भजनात मिळू शकते. ज्या प्रमाणे मनुष्याला उदर पोषण करण्याकरीता भोजनाची आवश्यकता असते. त्याच प्रमाणे आत्म्याची तृप्ति ज्याच्यात अखंड आनंद आहे. करीता भगवत् भजनाची आवश्यकता असते, बाकी कोणतेच साधन युक्त नाही, तर विश्वांत सुख शांती, मिळवून घ्यावयाची असेल तर माणसांनी, नियमीत रूपाने हरी भजनात रंगून जावे व आनंदाने स्फुरित मन, आत्म्याला तेच आनंद समर्पित करतो, तोच आनंद अखंड स्वरूपाचा होतो. म्हणून भजनाद्वारे आत्मोन्नति करून, ईश तत्वांत मिळून जावे.

**– जैरामदास, कामठा**

# - अनुक्रमणिका-


| | | |
|---|---|---|
| १. | सोडुनि कुठे जाते | १ |
| २. | बोल्लारे हरी हो मानवा | २ |
| ३. | मानवी संग धर | २ |
| ४. | चाल मन चाल मन | ३ |
| ५. | जसे खाई अन्न | ४ |
| ६. | राही मनी विचार | ४ |
| ७. | पाहती जन वेडा | ५ |
| ८. | चाल चाल मना | ६ |
| ९. | ठेवी आत्म्यावर | ६ |
| १०. | परक्याचा जीव हा | ७ |
| ११. | मायावी लोकाला | ८ |
| १२. | कुणाचे दुर्गुण | ९ |
| १३. | स्थिति दुःखिताची | ९ |
| १४. | कामी क्रोधी लोभी | १० |
| १५. | जैशी परिस्थिती | ११ |
| १६. | ठेवू नको माधवा | ११ |
| १७. | जगी जिवू दे देवा | १२ |
| १८. | देवू नको केशवा | १३ |
| १९. | ज्या आईला पान्हा पानी | १३ |
| २०. | सत्याला पाहून तू चाल | १४ |
| २१. | सोडी नाही दया भाव | १५ |
| २२. | कैसे येऊ तुझ्या दारी | १६ |
| २३. | दमलो तुझ्या नादी | १७ |
| २४. | अरे मना हरि विन | १७ |
| २५. | मेरो राम पियारो | १८ |
| २६. | झालो त्रस्त या संसारी | १९ |
| २७. | घाबरला जीव हा | २० |
| २८. | जगी कोणी कोणाचा | २० |
| २९. | दुराचारी लोकात सज्जन | २१ |
| ३०. | दुष्ट करतो अपुले | २२ |
| ३१. | सांग कशी विसर | २३ |
| ३२. | कां विसरला स्वहिताचे | २३ |
| ३३. | अजुनि न आले | २४ |
| ३४. | तू सर्व काम सत्याला | २५ |
| ३५. | कुठे शोधसी गिरी कंदरी | २६ |
| ३६. | आम्ही गोकुळच्या गौळणी | २६ |
| ३७. | ऐक न तू आता माझे | २७ |
| ३८. | जोडुनि जन्म जन्मीचे | २८ |
| ३९. | पाप पुण्याची भीती ठेव | २९ |
| ४०. | हिन्दु भूमिच्या वासियांनो | २९ |
| ४१. | सत्य काम करता | ३० |
| ४२. | किती सांगू रे देवा | ३१ |
| ४३. | कसौटी कुठवरी घेशील | ३२ |
| ४४. | तुझ्या जगाची आज दशा | ३२ |
| ४५. | चढली नामाची नशा | ३३ |
| ४६. | मरना जीना माया खेल है | ३४ |
| ४७. | गुरू ने मेरे हृदय पर | ३५ |
| ४८. | तुझ्या भेटी विन सुख | ३६ |
| ४९. | भोळ्यांच्या मेळ्यात | ३७ |
| ५०. | करी तू इतके रे देवा | ३७ |
| ५१. | इथे सर्व ठायी दुःख दिसे | ३८ |
| ५२. | देह तुझा आहे मानवाचा | ३९ |
| ५३. | कर्म अकर्माचा माप | ३९ |
| ५४. | लाग गड्या लाग | ४० |
| ५५. | आंधळ्याच्या मायी | ४१ |
| ५६. | कोणा मान अपमान करो | ४१ |
| ५७. | पाहुनि दुसऱ्याचे दुःख | ४२ |
| ५८. | भाव ओळखतो सर्वाचे | ४३ |
| ५९. | म्हणावे श्रेष्ठ कोणाला | ४३ |
| ६०. | ठेवीशी जपून समयज्ञान | ४४ |
| ६१. | कोण लक्षात घेतो | ४५ |
| ६२. | घ्यावा डिप्लोमा | |
| ६३. | कोणी पापी असो या | |
| ६४. | कधी राहतो मी | |
| ६५. | धन्य धन्य तू ग आई | |
| ६६. | जन्म मरण देहाचे | |
| ६७. | रामकृष्ण हरि | |
| ६८. | काय सांगु गा रामा | |
| ६९. | भाव भक्तिची एकी करा | ४५ |

# प.पू. संत जैरामदास उर्फ लहरीबाबा



जन्म : ब्रम्ह मुहूर्त ७.१२.१९२२

महानिर्वाण : मार्ग शीर्ष शुक्लपक्ष तृतीया ११.१२.१९९९

## भजन क्र. १ (सोडुनि कुठे जाते...)

(चाल - मोहे भूल गये सांवरिया)

सोडुनि कुठे जाते, आम्हास तू ग आई।
तुझ्या वाचूनि चैन मनाशी आमुच्या नाही॥ धृ॥

आता आमुचे सुख दुःखाचे,
ऐकिल कोण गऱ्हाणे।
कोण देईल आम्हा सांत्वना,
कोण पाजी प्रेम पान्हा॥ १॥

तुझ्राच होता आम्हा गर्व,
तुझेच होते आम्हा भूषण।
धैर्य हे आता खचत चालले,
कोण ऐकिल बोबडे बोल॥ २॥

लहाणपणा पासूनि,
संसार हा असार वाटे।
कुठे मिळे माझ्या जिवाला,
ह्या देही ठिकाणे॥ ३॥

जैराम म्हणे मिळाला,
थोड्या दिवसाचा हा संग।
त्यात ही पांडुरंगा,
केला तू रे उणे॥ ४॥

## भजन क्र. २ (बोल्लारे हरी हो मानवा...)

(चाल - मी डोलकर डोलकर दरीयाचा राजा)

बोल्लारे हरी हो मानवा, येईल तुमच्या काजा।
आम्ही दिलगीर दिलगीर , गुरू आमुचा राजा ॥
अशी भावना ग, चरणी जडू दे तुझ्या ऽऽऽ ॥ धृ ॥

बहु जन्माचा पुण्याचा साठा, संधी आली।
ही मिळाली ग, लई जन्मानी माऊली ॥
त्रितापाचा ग पापाचा उतरील ओझा ॥ १ ॥

सार्थक साधण्या आम्ही आलो, या जगी।
पाहू पांडूरंग, जीवन उद्धरण्या वेगी ॥
डोळा भरूनी ग, पाहू पंढरीचा राजा ॥ २ ॥

नको आम्हासी व्रत नेम नको मुक्ति।
जडो जन्मो जन्मी हृदयी त्यांची भक्ति ॥
वास राहो सदा, विसर न पडो कदा ॥ ३ ॥

जैराम म्हणे गुरू, आमुचा नावाडी।
नेईल आम्हाला ग, आम्हाला पैलथडी ॥
भव पाश्यातुनी सोडवून करील रजा ॥ ४ ॥

## भजन क्र. ३ (मानवा संग धर सज्जनाचा...)

(चाल - माझिया हृदयाच्या मंदिरी)

मानवा संग धर सज्जनाचा
सुखी करण्या जिवनाला ॥ धृ ॥

वाईट दिसे जे जे कर्म, घालू नको तू तिथे मन।
नेहमी ठेवी सत् बुद्धि तू, पाहण्या देवाला ॥ १ ॥

आधी सोड तू मी तू पणाला, इन्द्रियावर कर तू ताबा।

जाळुनि आशा तृष्णा लोभा, लागी भजनाला ॥ २ ॥

परदु:ख आपुले जाणावे, चन्दना परी नित्य झिजावे ।
नेहमी त्याचे विचार करावे साक्षी आत्म्याला ॥ ३ ॥

बोल तू ऐसे नित्यं बोल, होई सर्व ठाई मोल ।
कोणा न पडो त्याचा विसर; देह जरी गेला ॥ ४ ॥

जैराम म्हणे सोडा संशय, नाम घेऊनि काढा भय ।
हेच मार्ग दिसे सोपे, जिंकण्या काळाला ॥ ५ ॥

---

## भजन क्र. ४ (चाल मन चाल ...)

(चाल - इक परदेशी मेरा दिल ले गया)

---

चाल मन चाल मन हरि दर्शना,
अशी संधि तुला रे मिळे ना पुन्हा ॥ धृ ॥
किती जन्म झाले भटकत फिरतो ।
एक क्षण ही कुठे न थांबतो ॥
किती दु:ख झाले रे माझ्या जिवना ॥ १ ॥
पाहुनी मायेचा बाजार ।
आनन्द वाटे तुला रे फार ॥
भूलुनि गेला तू राधा रमणा ॥ २ ॥
विषयाचे सुख मोठे गोड वाटे ।
हरिनामी तू रे क्षणोक्षणी नटे
सत्य असत्य ते कधी सुचेना ॥ ३ ॥
सत्याचे घेई धडे, मोक्ष पद मिळे ।
जेंव्हा करी तू खोटे नाटे चाळे ॥
जीव पडतसे भव बंधना ॥ ४ ॥
जैरामदास म्हणे ऐक तू आता ।
मिळाली संधि निघू न दे हाता ॥
सुपंथाची वाट घेई, हरी भजना ॥ ५ ॥

## भजन क्र. ५ (जसे खाई अन्न तसे...)

(चाल - तेरे प्यार का आसरा)

जसे खाई अन्न तसे होई मन।
तसे येई गुण, बुद्धि मध्ये॥ धृ॥

तसे कर्म घडुन येती, तया पासुनि।
तसी संगती जुळे, जशाची तशानी॥
नित्य निरंतर राही डौला मध्ये ॥ १ ॥

सुख दुख भोगणे, कर्म अकर्माने।
तसे वर्म घडुनि येई संचित फळाने॥
वैरी न मित्र, कुणी जगा मध्ये ॥ २ ॥

सज्जनाच्या अन्ना ने मती शुद्ध होई।
दुर्जनाचे बोलाने, दुर्गुण अंगी येई॥
संगति पाई पतिव्रता नाडे ॥ ३ ॥

जैरामदास म्हणे, विचार करूनी पाहा।
सुख मिळे जीवा, तसा मार्ग घ्यावा॥
विश्वास ठेवी तू, माझ्या वाणी मध्ये ॥ ४ ॥

## भजन क्र. ६ (राही मनी विचार...)

(चाल - रमला कुठे ग कान्हा)

राही मनी विचार, तैसे करी तो व्यवहार॥ धृ॥

अज्ञानी असो वा ज्ञानी, मुळ स्वभाव जाई न मनी
तैसे घडे आचार ॥ १ ॥

घरी संताची संगत त्या विण न राही क्षण मात्र।
तेच त्याचे माहेर ॥ २ ॥

पूर्वीचे कर्म फळ, तसे मिळाले त्या वर्म।
त्याचा घेई तो सार॥ ३ ॥

आधी केले कुकर्म, तसे मिळाले त्या वर्म।
सुटे ना त्याची ती चाल ॥ ४ ॥

जसी ज्याची संगत, तसे घडे मनोरथ।
पुरवी तसा हरि हर ॥ ५ ॥

जैराम म्हणे जसे संचिती, तसे घडुनि येई प्रचिति।
चुके ना कल्पान्तर ॥ ६ ॥

---

## भजन क्र. ७ (पाहती जन वेळा पीसा...)

(चाल - माझिया हृदयाचे मंदिरी)

---

पाहती जन वेळा पीसा।
लीन राही ब्रम्ह दशा ॥ धृ॥

शहाणा असे अन्तरात।
कळे न कुणाला त्याची मात ॥
मग्न राही निज स्वरूपात।
मुर्खा कळे न भाषा ॥ १ ॥

माटी सोने दिसे समान।
लाभ हानित दुखी न मन ॥
मान अपमानाचा न ठेवी ध्यान।
राही राम नामी नशा ॥ २ ॥

पाही नयनी एक हरी।
आपले आपण बोलणे करी ॥
मुळीच दिसेना दूजातरी।
पाही दाही दिशा ॥ ३ ॥

जैराम म्हणे तैसे मर्म।
कळे न कुणाला त्याचे वर्म ॥
दुखि दुखिताचे समझे धर्म।
जाईल त्या वंशा ॥ ४ ॥

## भजन क्र. ८ (चाल चाल मना...)

(चाल - आप मुझे अच्छे लगने लगे)

चाल चाल मना संत संगा - अरे
चाल चाल मना संत संगा
नयनी बघू पांडुरंगा ॥ धृ॥

इह लोकी जीवाला सुख ना मिळे।
नित्य नवे माया दावी चाळे॥
सर्व कामे इथे खोटे ठरे।
अरे - सावध होरे नाही तर दगा॥ १ ॥

समझे ज्यासी तू हित आपुले।
तेच नेई तुला नरका कडे॥
क्षण भंगुर सुखात जीवन नडे।
अरे-रमु नको तू रे खोट्या रंगा॥ २॥

संताविण जीवाला सुख ना मिळे।
घेई तू नित्य रे त्यांचे धडे॥
तेव्हा देवाचे तुज मर्म कळे।
अरे हरि भजनी तू रंगून जा गा॥ ३॥

जैराम म्हणे खोवू नको वेळ।
टपून बसला आहे काळ॥
नर जन्माचा करी रे मोल।
अरे-तेव्हां मिळे तुज चरणी जागा॥ ४॥

## भजन् क्र. ९ (ठेवी आत्म्यावर भरोसा...)

(चाल - ही राम नौका)

ठेवी आत्म्यावर भरोसा, वाढेल मनो बल॥ धृ॥
जीवन होईल सुफल फिटेल येरझार।
विश्वास ठेवी मनी, सुपंथाने तू चाल॥ १॥

सत्य असत्य कर्म, निरखुन पाही बारे
समजे खोटे तुला रे त्याला तू नित्य भुल ॥ २ ॥

जरी ठेविलास तूरे, मोह मायावर विश्वास।
होइल तूझा घात, सत्य समंज हे बोल ॥ ३ ॥

अभिमान असत्याचा, होता त्या रावणासी।
चोरून नेले सीतेसी, राम बाणी तो मुकला ॥ ४ ॥

जैराम म्हणे जो प्राणी, धनपुत्राचा न ठेवी भरोसा।
आत्म्याचे जो न ऐकी, जीवनी तो नडेल ॥ ५ ॥

---

## भजन क्र. १० (परक्याचा जीव हा घेणारा...)

(चाल - भेटेन नऊ महिन्यानी)

---

परक्याचा जीव हा घेणारा।
देईल का न्याय जगाला ॥ धृ॥

सत्याची ओळख नाहीं,
कसे दुःखीताचे दुःख पाही।
चाल-मनी असे कपट छल, त्याचे सुख काय मिळेल।
ज्याचे पाशी दयेस नाही थारा ॥ १ ॥

लत असे ज्याचे खोटे कामी।
कसे जडेल मन हरिनामी ॥
चाल-मंदिरी बैसुनि करी ध्यान, चित्त असे पर धन
कशी मिळेल शांति, त्याच्या जिवाला ॥ २ ॥

अंगी असे द्वेषाचे हे मळ,
कसा सज्जनासी ओळखेल ॥
चाल-संगती करे खोट्याची, माती केली हे जिवनाची।
भुलला तो अपुल्या स्वहीताला ॥ ३ ॥

देव दगडाचा करूनी ठेवी भाव,
बकऱ्याचा घेई जीव।
चाल-नाही मनी थोडी कीव, कसा मिळेल पंढरीराव।
जैराम म्हणे दया नाही पाप्याला,
देईल का न्याय जगाला॥ ४॥

---

**भजन क्र. ११ (मायावी लोकाला...)**

(चाल - आप मुझे अच्छे लगने लगे)

---

मायावी लोकाला वाचून चाल।
नाही तर तुझे होतील हाल॥ धृ॥

कामी क्रोधी लोक आहे फार।
टाकतील तुझ्या वरी खोटे जाळ।
जीवन तुझे करतील जरजर।
सत्य समज मानु नको फोल॥ १॥

संसार आहे हे मोठे वन।
माया दावी अपुले थोर पण॥
जीव हा नित्य करी रूदन।
जपी तपी योग्याना पडली भुल॥ २॥

इथे तुला मिळतील स्वार्थांचे संगी।
सोडतील सारे वेळ प्रसंगी॥
नाडल्या जाशील असे हे ढोंगी
सोड ही संगत तुझं होइल भल॥ ३॥

जैराम म्हणे केव्हा करतील घात।
माझी ही गोष्ट ठेवी ध्यानात॥
मन लावी हरी भजनात।
तेव्हा भव बंधन तुटतील॥ ४॥

## भजन क्र. १२ (कुणाचे दुर्गुण पाहिल्या विन...)

(चाल - प्रभू हा खेळ दुनियेचा)

कुणाचे दुर्गुण पाहिल्या विन, कुणाला दोषी न ठरवावे।
उगीच करू नये निन्दा, ते दोष शिरी ना घ्यावे ॥ धृ॥

कानाने ऐकिली मात, डोळ्यानी अंतर आहे।
क्षणी क्षणी करा विचार, अनुभव घेऊनी पाहे ॥ १ ॥

बोलावी ऐशी भाषा, कुणाला येईना निराशा।
मिळो सर्वांना सुख शांति, तसेच बोल बोलावे ॥ २ ॥

बसावे ऐसे ठिकाणी, उठ ना म्हणे त्या कुणी।
न ये वीट कुणाला, ऐसी ती जागा पाहावी ॥ ३ ॥

आड मार्गी कुणी जाई, दावा त्याला सत् मार्ग।
धर्म मर्यादा दावून, सत कर्मी लाबावे ॥ ४ ॥

म्हणे जैराम मिळे सार, आयुष्य तिथे वेचावे।
हीच वाट सुगम दिसे, देह परामार्थी लावावे ॥ ५ ॥

## भजन क्र. १३ (स्थिती दुखिताची...)

(चाल - ही राम नाम नौका)

स्थिती दुखिताची, दुखिताशी नित्य कळे।
घडली असेल ज्यासी त्यालाच समझे धडे ॥ धृ॥

घडले गरीबी ज्याला कैसी विपत्ती भोगिले।
त्याचे त्यालाच ठाव, जीवनाचे ते पोवाडे ॥ १ ॥

भक्त प्रल्हादावरी आले संकट भारी।
कळले न पापीयांशी करीत होते ते चाळे ॥ २ ॥

गर्भवतीचे सुखःदुख, निपुत्री काय जाने।
घेईल ती अनुभव, तेव्हा मर्म तीशी कळे ॥ ३ ॥

आपल्या वरून तू दुजाशी जान बरे।
जैराम म्हणे रे तेव्हा, भव बंधने तुटे रे॥ ४॥

---

## भजन क्र. १४ (कामी क्रोधी लोभी...)

(चाल - देदी हमे आजादी बिना)

---

कामी क्रोधी लोभी लोकाशी वाचूनी, तू चाल
कोण्या दिवशी करतील, देहाचे बेहाल॥
मागे पुढे पाहुनी चाल॥ धृ॥

ज्यांनी ज्यांनी ठेविला ह्या लोकावरी विश्वास।
नाडल्या गेले यांचे पाई, जिवनी झाला घात॥
भोगणे पडले विपत्ति भारी, देही झाला त्रास।
चिन्तातूर होऊनी फिरले, झाले ते बेजार॥ १॥
कोण्या दिवशी काय -

गुण असे ह्यांचे अंगी, हित कैसे साधावे।
कैश्या परी फसवूनी, लोका लुबाडावे॥
वरपंगी गोड बोलुनि, छल करावे।
वेळेपूर्ति ठेवी प्रीति, मनात खोटी चाल॥ २॥
कोण्या दिवशी काय -

धर्म निष्ठा सुस्वभावी होते पांडव।
द्यूता मधे कपटी शकुनि मांडिला डाव।
हरण केले त्यांचे राज्य द्रौपदी सव।
जैराम म्हणे असी त्याची दुरंगी चाल॥ ३॥
कोण्या दिवशी काय -

## भजन क्र. १५ (जैसी परिस्थिती येईल...)

(चाल - देदी हमे आजादी बिना)

जैसी परिस्थिती येईल तैसे वागावे ।
धैर्य विमुख मानवानी कधी न व्हावे ॥
धर्मनीती सोडु नका ॥धृ॥

करीत असा कर्म तुम्ही नेहमी आपुले ।
सुख दुःखामधे नित्य ही आनन्द मानावे ॥
हरी भजनाविण कधी न व्यर्थ बोलावे ।
जसे लिहिले संचित, भोगीत राहावे ॥१॥

सिद्धान्त एक तत्व भाव कधी न सोडावे ।
जरी प्राण गेला तरी प्रण कधी न भुलावे ।
मानवाने हेच कर्तव्य पाळावे ।
दिन दुबळ्याकरिता नेहमी, देह वाहावे ॥२॥

तोच मनुष्य देव होतो एके दिवशी ।
तनु त्यागिता मिळे, अमर कीर्ति तयाशी ॥
जैराम म्हणे संधि आली, देव पाह्यासी ।
दवडू नका अमोल घडी, जपून चालावे ॥३॥

## भजन क्र. १६ (ठेवू नको माधवा...)

(चाल - नेऊ नको माधवा अक्रूरा)

ठेवू नको माधवा, मनी राग,
किती अपराध, माझे घडले।
त्यासी पोटी घ्यावा॥ धृ॥

भुललो देवा माया जाळी।
तुज विण आम्हा कोण सोडी।
कोणी दिसेना मज्ज कैवारी।
तुज विण कोणी, नसे विसावा॥ १॥

रात्रं दिन हे भ्रमणी मन।
चिन्तेने हे जळले तन।
सुचेना तुझे नाम स्मरण।
सुवर्ण संधि, जाई वाया॥ २॥

भटकत आलो लई जन्माचा
कुठे न लागे थारा जिवाचा
धाव घेतला तव चरणाचा
जैरामाला पदरी घ्यावा॥ ३॥

---

## भजन क्र. १७ (जगी जिवू दे देवा...)

(चार - तेरे प्यार का आसरा)

---

जगी जिवू दे देवा, परमार्थ करूनी
नाही मग मागणे, दूजे तुज काही॥ धृ॥

नको मला काही, महाल अटारी।
दिन दुबळ्यांचे कामी, पडू वेळो वेळी॥
स्वाभिमान असावा, अहंकार नाही॥ १॥

धाव घेई पाय, खऱ्या कामा साठी।
नित्य पाहू स्वरूप, तुझे जग जेठी।
खोटे कृत्य काही न, माझे मनी येई॥ २॥

पोटा पुरते दे देवा, भाजी भाकर।
आल्या गेल्या लाही, मिळे भरपूर॥
उपाशी न राहो, एवढी कृपा ठेवी॥ ३॥

झिजो हा देह, प्रपंच परमार्थी।
जैरामदास म्हणे, न पडो व्यर्थी॥
दूजे काही नाही संग, जन्मो जन्मी देई॥ ४॥

## भजन क्र. १८ (देवू नको केशवा...)

(चाल - नेऊ नको माधवा अक्रूरा)

देवू नको केशवा, दु:ख हे
सोसवे ना, ह्या जीवाला।
मन हा व्याकुळ झाला ऽऽ ॥ धृ॥

पाठीशी ही, उभी चिन्ता।
समजत नाही रे भगवन्ता॥
कैसा खेळ हा रचिला नाथा।
कुणी हसला कुणी, रडत बसला॥ १ ॥

देऊनी जन्म, असा का रूसला।
कुठे जाऊनी तू रे बसला॥
कीव न येई अमुची तुजला।
शोधुनि तुजला, देह थकला॥ २ ॥

किती कसौटी घेशी अमुची।
नाही बुद्धि अमुचे पाशी॥
कसे ओळखावे तुझे मर्म।
काही कळेना पामराला ऽऽऽ ॥ ३ ॥

कोण म्हणे तुज देव अशाने।
ऐकत नाही माझे गाऱ्हाणे॥
जीव फिरतसे व्याकुळतेने।
जैराम म्हणे ब्रीद सांभाळा ऽऽ ॥ ४ ॥

## भजन क्र. १९ (ज्या आईला पान्हा...)

(चाल - आप मुझे अच्छे लगने लगे)

ज्या आईला पान्हा नाही अरे
तिला आई कसा म्हणु॥ धृ॥

ज्याचे हृदयी नाही प्रेम भाव।
धर्म नीति नाही, प्रभुचे नाव॥
कसा म्हणु भाऊ, न अंतरी भाव।
जीवाचा जिव्हाळा कसा म्हणू॥ १॥

स्त्री असे जीवन संगी मित्र।
वेळो वेळी सलाह दे पवित्र॥
पण तिचे स्वार्थी पुरते प्रीत।
अशा बाईला पतिव्रता कसा म्हणू॥ २॥

ज्याचे मुखात राम नाहीं।
त्याचे संगतीने जीव वाया जाई॥
सुखा विन दुःखाचे ओझे घेई।
ऐशास मानव कसा म्हणू॥ ३॥

जैराम म्हणे सत्य ज्याचे पाशी।
तोच असे माझा ऋषी केशी॥
जुळो त्याची प्रीत अहर्निशी।
जो जीवन उद्धरण्याच्या कामी येई।
त्याला आम्ही गुरू म्हणू॥ ४॥

---

## भजन क्र. २० (सत्याला पाहून तू चाल ...)

(चाल - शाम ढले जमुना किनारे)

---

सत्याला पाहून तू चाल।
दे रे मन दे तू हरि नामी जोर॥
सत्य असत्याला तू परखूनि चाल।
खोट्या कामासी नित्य तू सोड॥ धृ॥

हरि पंथा गेले, सती आणि संत।
जन्म मृत्युचे तोडिले भवबंध॥

देह त्यागून ठेविली कीर्ति, अमर केले नाव।
मिळविले अढळ पद मोक्षाचा ठाव।
धर्म नीति ला तू पाळ॥ १ ॥

जन वाइट म्हणे, त्याला सोडून चाल।
वन्दना करी ज्याला, त्याला धरूनी चाल॥
पाप कर्मा भिऊन चाल सत्मार्ग जोड।
त्यानेच तुझे होई जगी मोल।
खोवू नको अनमोल वेळ॥ २ ॥

जो हरिला भजतो, तो हरिचा होतो।
कर्म सुधरल्याने, भाग्योदय होतो॥
जैरामदास म्हणे सोड, खोटे माया जाळ।
टपूनी बैसला आहे पुढे काळ।
राम नाम घे हो भवपार॥ ३ ॥

---

## भजन क्र. २१ (सोडी नाहीं दया भाव...)

(चाल - नेऊ नको माधवा, अक्रूरा)

---

सोडी नाहीं दया भाव, संत हे।
प्राण हरले, कुणी त्यांचे।
सोडी नाहीं वचन॥ धृ॥

बहुदया असे त्यांचे हृदयी।
रंजले गांजले, पोटी ठेवी॥
द्वेषाचा त्या गंध ही नाही।
मान अपमानाचा, मुळी न ध्यान॥ १ ॥

देह झिझवती रात्रं दिवस।
किती ही झाले त्यांना त्रास।
परि न सोडती ते धैर्यास।
धुंद असे त्या, जन कल्याणा॥ २ ॥

जड जीवांना तारायासी।
जगी फिरूनी काढती भ्रांति॥
सत्कर्म सुपंथ दावूनि।
देती पटवूनी खरे ज्ञान॥ ३॥

जैराम म्हणे रक्षण्या धर्म।
येती भूवरी, दावण्या वर्म॥
जीवाचा हा भेद मिटवूनि।
तत्क्षणी तोडती, भव बंधन॥ ४॥

## भजन क्र. २२ (कैसे येऊ तुझ्या दारी...)

(चाल - कैसे जाऊँ जमुना के तीर)

कैसे येऊ तुझ्या दारी मीरे।
भुललो या संसारी देवा रे॥ धृ॥

गाव तुझे बहु दूर कान्हा।
आशा तृष्णा ओढाळ वासना॥
भुलविती मजशी मायावना।
कोण देई सांत्वना रे ॥ १॥

काम क्रोध हे पहाड मोठे।
आडवे पडती माझे वाटे॥
येती अंगी शहारे मोठे।
मज ते मार्ग सुचेना रे ॥ २॥

चहुदिशा बघतो नेत्र उघडूनी।
तरी तू न दिसशी रे चक्रपाणी।
मनी धीर धरवेना ऽऽऽ ।
अश्रु भरूनि येई नयना॥ ३॥

जैरामदास म्हणे तुझ्या कृपे विन।
उद्धरले ना कुणाचे जीवन॥
मी पामर शरणी आलो।
पोटी घेई तू आई रे ॥ ४॥

## भजन क्र. २३ (दमलो ऽऽऽ दमलो तुझ्या...)

(चाल - मुरली बैरन भई रे कन्हैया)

दमलो ऽऽऽ दमलो तुझ्या नादी रे कान्हा।
दमलो तुझ्या नादी ॥ धृ॥

देहभान राहिले नाही, ऐकून तुझी मुरली।
सुचत नाहीं वाट ती मजला ॥
रमलो तुझ्या छन्दी ॥ १ ॥

तहान भूक सर्व हरपली, सुध बुध सारी गेली।
धुंद भरली नयनी तुझी ॥
गेली प्रपंच उपाधि ॥ २ ॥

जिकडे पाहतो तिकडे तुझ्या दिसे न कुणी दुजा।
जैराम म्हणे लागले वेड ॥
पदी जडली बुद्धि ॥ ३ ॥

## भजन क्र. २४ (अरे मना हरि विन...)

(आसावरीराग : चाल - अरे मन समझ समझ पडा धरिये)

अरे मना हरि विन कोणी नाही।
का भुलतोसी भलत्या ठाई ॥
समजुनी पाऊल धरि रे ॥ धृ॥

गण गोत्र कुटुंब परिवार।
या पासुनी न मिळे सार ॥
तुला कोणी हे संग न देई ॥
अर्हनीशि हरी नाम घेई रे ॥ १ ॥

जिथे पाहतो तिथे माया-जाळ।
टपूनी बैसला आहे काळ।
ओढती तुजला अपुले ठाई।

क्षणो क्षणी विचार करी रे ॥ २ ॥

स्वप्न सुखात भूलू नको रे।
खोट्या कामी राहू नको रे।
या पासून कुणा सुख न होई।
दु:खचि हाती येई रे ॥ ३ ॥

जैराम म्हणे ऐक म्हणणे।
संत चरणी, लीन होणे।
देतो मी अनुभवाची ग्वाही।
या वचना ला भूलू नको रे ॥ ४ ॥

---

## भजन क्र. २५ (मेरो रामपियारो साथी रे...)

(चाल - कशाला पंढरी जातो रे)

---

मेरो रामपियारो साथी रे बाबा, रामपियारो साथी
जैसे दीपक बिन ज्योति ॥ धृ॥

चलती के कुटुम्ब संगाती,
आये विपत्ति कोई न साथी।
पाया नर तन व्यर्थ न खो तू
लगाले हरि से प्रीति ॥ १ ॥

कंचन जैसी तेरी काया
इसका विचार न किया।
उड जायेगा पंछी यहाँ से,
रह जायेगी माटी ॥ २ ॥

कहता है मेरी महाल अटारी
कहता है सुत नारी
झूठी है ये ठगनी माया
बचके कर तू प्रीति ॥ ३ ॥

किसकी रात किसका ये दिन
पल का नहीं रे ठिकाणा।
श्वास श्वास में भजले हरि को,
रह जायेगी तेरी कीर्ति ॥ ४ ॥

जैरामदास कहे रे बाबा,
संतों का संग तू धर
दुःख और सुख में हरिको भजले,
मिल जायेगी मुक्ति ॥ ५ ॥

---

## भजन क्र. २६ (झालो त्रस्त या संसारी...)

(चाल - येरी मैं तो प्रेम दिवानी)

---

झालो त्रस्त या संसारी, पाहुनी दुराचारी।
अश्रु येती माझे नयनी, बघवेना मुरारी ॥ धृ॥

चैन न मिळे या जीवाला,
हुर हुर वाटे मना।
कोण्या कामी लक्ष न लागे, चिन्ता अष्ट प्रहरी ॥ १ ॥

कामी, क्रोधी, लोभी लोक,
देती मज दुःख।
स्वार्था पुरते लावूनि प्रीत , करती फसवे गिरी ॥ २ ॥

भ्रमली बुद्धि ह्यांचे पाई
सुचेना कांही।
तळमळ मोठी हीच अंतरी, केंव्हा मिळे कैवारी ॥ ३ ॥

जैराम म्हणे आस धरूनि।
बसलो आहो इथे।
दृढ़भाव हा देवा चरणी, ठेवुनि नाम उच्चारी ॥ ४ ॥

## भजन क्र. २७ (घाबरला जीव हा...)

(चाल - वाजवी पावा गोविन्द)

घाबरला जीव हा
पाहुनि मायेचा रंग।
विसरला तो पांडुरंग,
उठती नाना तरंग॥ धृ॥

काम, क्रोध, लोभ
दाविती आपुले जोर।
ह्या पाई जीव झाला तंग॥ १ ॥

ओढाळ वासना ही
नेतसे पापाचे डोई।
घेई मन विषयाचा संग॥ २ ॥

भक्ति पंथात
अहर्निशि पडती अडथळे।
भजनी ये कठिण प्रसंग॥ ३ ॥

सांगे जैराम, प्रपंची आठवेना राम।
तरण्या घ्यावा गुरू संग।
हीच वाट दिसे सुभग॥ ४ ॥

## भजन क्र. २८ (जगी कोणी कोणाचा...)

(चाल - जगी ज्यास कोणी नाही)

जगी कोणी कोणाचा,
मित्र शत्रु नाही।
कर्म आणि अकर्म हे,
मित्र शत्रु आहे॥ धृ॥

जसे जसे कर्म करी,

तसे तसे पाही।
अहर्निशि मनि विचार,
तसे येत राही।
त्या आनंदी तो डोलत राही ॥ १ ॥

वाईट जन ते दिसे दुर्योधना।
धर्मराज नयनी ते पाही सज्जना ॥
जसे ज्याचे अंतरी भाव,
तसे स्वरूप पाही ॥ २ ॥

कर्मावर अवलंबित,
भाग्य तुमचे आहे।
जसे बीज तैसे फळ,
होऊन राहे ॥
जैराम म्हणे मनी शोधून पाहे ॥ ३ ॥

---

## भजन क्र. २९ (दुराचारी लोकात...)

(चाल - जगी ज्यास कोणी नाही)

---

दुराचारी लोकात, सज्जन जरी राही।
काय सुख मिळे त्यास त्या पासुनी ॥ धृ ॥

खोट्या नाट्या कामात, राही त्याचे ध्यान।
कधी न देवाचे त्याने, केले चिन्तन ॥
सुखाविन दुःख तो, मोल हाती घेई ॥ १ ॥

दुर्जनाचे संगति ने, सज्जन तो नाडे।
तैसी प्रचीती त्याला, नित्य घडे।
क्षणो क्षणी पुण्य त्याचे, क्षीण होत राही ॥ २ ॥

काय मोल होई त्याचे, धुर्त लोकात।
शेवटी फजीती होई, पडे जिवनी घात ॥
दया प्रेम सत्गुण, अंगी त्याचे नाहीं ॥ ३ ॥

राक्षसाचे समोर, देव जरी आले।
काय कळे वर्म अंती, ते ही थकुनि गेले।
जैराम म्हणे प्रीति, करावे जपूनि ॥ ४ ॥

---

## भजन क्र. ३० (दुष्ट करतो आपुले काम...)

(चाल - लेके पहला पहला प्यार)

---

दुष्ट करतो आपुले काम, सज्जनाने जपावे नाम।
सत्य असत्य ओळखूनि, चाला तुम्ही ॥ धृ ॥

नरदेह दोघांना मिळाले, कर्म यांचे वेगळाले।
एक भुलला विषया छंदी, दुजा असे ब्रम्हानंदी ॥
ज्यास मिळे जशी संगत, पूर्ण झाले मनोरथ ॥ १ ॥
सत्य असत्य ---

एक करतो फसवे गिरी, दूजा नित्य ब्रिद संभाळी।
एका जवळी द्वेष भाव, दूसरा पाही ठाई ठाई देव ॥
देवावर फुल एक चढे, दूजा पाया खाली तुडे ॥ २ ॥
सत्य असत्य ---

स्वत:वरूनी दूजास पाही, सुख दु:खात समरूप राही।
ठेवुनि सर्व जिवावर प्रीति, सत्य करूणा ही त्याची नीति ॥
ठेवुनिया दृढ भाव, दीना कडे त्याची धाव ॥ ३ ॥
सत्य असत्य ---

एका आईचे दोघे सुत, एक मानव दुसरा भुत।
कर्म फळ भोगणे संचित,जीवा मिळे हित अनहित ॥
स्वर्ग नर्क इथे मिळे, जैसी बीजे तैशी फळे ॥ ४ ॥
सत्य असत्य ---

किती हीन पतीत असला प्राणी, उद्धार होई संत संगानी।
जैराम दास म्हणे रे बाबा, चारही फळे संत चरणी।
आल्या जन्मा साधा हित, जोडा देवाशी तुम्ही प्रीत ॥ ५ ॥
सत्य असत्य ---

## भजन क्र. ३१ (सांग कशी विसर पडली रे...)

(चाल - मधुबन में राधिका नाचे रे)

सांग कशी विसर पडली रे तुला।
भुलला तु रे माणुसकीला॥ धृ॥

अंगी नाहीं सत्गुण, नाही प्रेम न कीव।
जीवनाचा मातेरा केला रे॥ १॥

नाही कुणाची शर्म लाज, येई मनि तैसे करि काज।
सत्य असत्य नाहीं ओळखिला रे॥ २॥

ज्यासाठी हा देह लाभला, त्या कामाला विसरला
कर्म करार ठावूक नाही तुला॥ ३॥

माझे माझे म्हणूनी, गर्व नादी फिरतो।
मुकला तू हरि भजनाला॥ ४॥

जैराम म्हणे अंत:काळी, कोण होईल कैवारी।
खोट्या कर्मी, नाडल्या गेल्या रे॥ ५॥

## भजन क्र. ३२ (का विसरला स्वहिताचे...)

(चाल - भेटेन नऊ महिन्यानी)

का विसरला स्वहिताचे ते काम,
आठविला कधी ना राम॥ धृ॥

जन्म भरी कामाची तुज गोडी।
देवाचा संग ना जोडी॥
चाल - दु:ख ते जीवनी पडले।
सुख हाती ना आले॥
आले भोगा या कर्माचे ते वर्म॥ १॥

सत्य असत्याचा विचार तू न केला।
आयुष्य व्यर्थ गमाविला॥

चाल - काळाचा ग्रास तू झाला।
जन्म मृत्यु बंधनी पडला॥
भुलुनि गेला तु रे काम नाम॥ २॥

नर देहाच्या करसी गर्व गुमान।
काय होईल ह्याचे न भान॥
चाल - घेतली न कुणाची कींव।
तुझा फसवेगिरीचा डाव॥
विकले तू आपुले नीति धर्म ॥ ३॥

निर्दयतेने कापी दिनाचा गळा॥
पुर्व पुण्याचा केला वाटोळा।
चाल - जैराम म्हणे भू-भार।
लागले पाठी येर झार॥
जन्मो जन्मी पाठीशी रे यम॥ ४॥

---

## भजन क्र. ३३ (अजुनि न आले...)

(चाल - अजहुँ न आये बालमा)

---

अजुनि न आले, घनश्याम माझे।
चैन न वाटे जीवा॥ धृ॥

सुध न वाटे त्या वाचूनि।
नीर वाहे सदोदीत नयनी॥
कुठे रमला तू रानी वनी।
माझ्या दुःखाचा कोण विसावा॥ १॥

जिकडे तिकडे भटकत आहो।
मिळे न कुठे सांत्वना॥
बघता बघता नेत्र हे थकले।
कसे धैर्य मी धरू देवा ऽऽ ॥ २॥

जैराम म्हणे रे दीन दयाळा।
कां आम्हावरी आहे तू रूसला।
धावुनि येई ब्रीद रक्षण्या
ही हाक तू कानी घ्यावा॥ ३॥

## भजन क्र. ३४ (तू सर्व काम सत्याला...)

(चाल - तू हरेक मुसीबत का मुकाबला कर रे)

तू सर्व काम सत्याला पाहुनि कर रे।
निर्भय होऊनि जगरे।
देवाच्या दूता, संशय सोड॥ धृ॥

दु:ख सुख हे जीवन संगाती।
काय आहे तुझे हाती।
हरिशी नाता जोड॥ १॥

कर्म असे तू कर रे प्राण्या।
गेल्या वरती राहे कीर्ति॥
जगी अमर राहि बोल॥ २॥

आला तू ज्या कामासाठी
मिळवूनि घे तू त्या जगजेठी॥
हित साधण्या दे जोर॥ ३॥

तुझे गण-गोत्र चारी खाणी
भोगुनि आला चौऱ्याशी योनी।
कानी घे जैराम बोल॥ ४॥

## भजन क्र. ३५ (कुठे शोधसी गिरी कंदरी...)

(चाल - कुठे शोधसी रामेश्वर अन)

कुठे शोधसी गिरी कंदरी कुठे पाहासी मंदिरी
देव तुझा तो तुजपाशी ते, तू जागा भुललासी ॥ धृ॥

पूर्व पुण्य पदरी तुझे, मिळण्यादेवा आला काजे
भुलला तू रे स्वहिताला, जीवन केला रे वाटोळा ॥
काय तुझा उपयोग जगासी, अन्न राहुनि उपाशी ॥ १ ॥

याच देही स्वर्ग नर्क, याच देही देव असूर।
जसे जसे तू कर्म करीशीं, तसे तसे तू फळ भोगशी ॥
जसे तुझे रे मनी भाव, मिळशी त्या पदासी ॥ २ ॥

मृगानाभी कस्तुरी असुनि, गवत हुंगे सुगंध म्हणुनि
नाही त्याला अन्तरी ज्ञान, व्याकुळ होऊनि फिरे वनवन ॥
असीच गति या जीवाची, म्हणुनि फिरे चौराशी ॥ ३ ॥

जैराम म्हणे सत्संगाविन, मिळे न कुणा सांत्वन।
गुरू शरणी तू रे जाऊन, पटवुनि घे तू आत्मखूण।
अन्ती तुझा तूच साथी, तूझा तूच पाहासी ॥ ४ ॥

## भजन क्र. ३६ (आम्ही गोकुळच्या गौळणी...)

(चाल - मी राधा वृंदावनची)

आम्ही गोकुळच्या गौळणी, आम्ही बारा सोळा जनी
आहो सासुर वासनी ॥ धृ॥

कृष्ण करितो हा वाटेत खोडी।
मथुरेशी जाता घागर फोडी ॥
दही दुध लुटुनी करी शिरजोरी।
ऐक यशोदे गऱ्हाणी ॥ १ ॥

वाटेत उभा सौंगडे घेऊनि।
जरा धाक नाही याचे मनी।
धरोनी हस्त नेई मधुवनी।
घेई आम्हा मोहोनी ।। २ ।।

कदंबाच्या झाडावरी यमुनेतीरी,
वाजवी बाई मधुर बांसरी।
ऐकूनि नाद त्या मुरलीचा।
घर कामे गेली विसरोनी ।। ३ ।।

सांगा तुम्ही आपल्या कृष्णाला।
असे त्रास ना देई आम्हाला ।।
जैराम म्हणे अजब हरी लीला।
बिरला जाने कोणी ।। ४ ।।

---

## भजन क्र. ३७ (ऐक न तू आता माझे...)

(चाल - पूछो न कैसे मैने रैन बिताई)

---

ऐक न तू आता माझे गाऱ्हाणे।
किती सहावे, दुःख हे नाथा ।।
मन फिरतसे व्याकुळतेने ।। धृ।।

एक पळ जाते, वर्षा प्रमाणे,
अश्रु वाहे झऱ्या प्रमाणे।
आयुष्य गेले मी तू पणे ।। १ ।।

काम क्रोध हे दाविती जोर।
भव नदी भरली आहे अपार ।।
मद मत्सर ढळे रात्रंदिने ।। २ ।।

मोह विकारे जडली काया।
सुवर्ण संधि जाते वाया ।।
तुझ्या हाती तरणे मरणे ।। ३ ।।

जैराम म्हणे तूच कृपाळू।
विश्वाचा तू आहे कनवाळू॥
तुझ्या सत्ते विन हाले न पाने ॥ ४ ॥

## भजन क्र. ३८ (जोडुनि जन्म जन्मीचे नाते...)

(चाल - सोडूनि वैभव मन्दिर अपुले)

जोडुनि जन्म जन्मीचे नाते।
देव कामे करी।
होई तो भक्तांचा कैवारी॥ धृ॥

भाव पाहुनि निर्मल त्याचे।
सोडिले सारे वैभव अपुले ॥
धावुनि आले भीमा तीरी
कळवळला असे अन्तरी ॥ १ ॥

पुंडलिकाचे साठी देव।
विटेवरी उभा कटेवरी हात॥
मुखी भक्तांचे मनोरथ।
ब्रीद त्याचे सांभाळी॥ २॥

दामाजीची हुंडी चुकविली।
द्रौपदीची लाज ठेविली॥
जनी सवे तो दळण दळी।
चोख्याचे ढोरे ओढी॥ ३॥

एक निष्ठ भाव धरूनी।
शरण जो घेई नित्य प्राणी॥
जैराम म्हणे दास होऊनी
करीतसे चाकरी॥ ४॥

## भजन क्र. ३९ (पाप पुण्याची भीती ठेव...)

(चाल - वृंदावन का कृष्ण कन्हैया)

पाप पुण्याची भीती ठेव।
पाहाणारा आहे देव॥
जैसे तू रे कर्म करीशी,
तैसे तुज मिळे ठाव॥ धृ॥

छल, कपट ठेवुन अन्तरी
करतो तू फसवे गिरी॥
दया नाही हृदयी तुझ्या।
जाशील नरकाचे द्वारी।
व्यर्थ जीवन का गमवितो, मनी ठेवुनी गर्व ॥ १ ॥

काम क्रोधाचे वशी होऊनी,
म्हणतो तू माझे माझे।
अज्ञाना मधे भूलूनिया,
घेतो पापाचे ओझे॥
पल घडीचा नाही भरोसा , सत्कर्मी बुद्धि ठेव॥ २ ॥

जे जे करशी ते ते भरशी,
सुटले नाही कुणा भोग।
जैराम म्हणे ऐक वचन॥
सत्कर्माला तू जाग।
संत संगात आयुष्य घालुनि, पार करी जीवन नाव॥ ३ ॥

## भजन क्र. ४० (हिन्दुभूमिच्या वासियांनो...)

हिन्दुभूमिच्या वासियांनो कर्तव्यासी जागा।
सत्य अहिंसा पर धर्म हृदयी तुम्ही राखा॥
तरूणांनो सावध व्हारे, नाजुक वेळ आली।
देशाच्या कामी लागा, वेळ न व्यर्थ घाली॥ धृ॥

भूमाते करिता जागा, तन मन धनाने तुम्ही।
स्वातंत्र्य राखण्यासी, नित्य झटारे तुम्ही ॥
सोडा रे द्वेष भाव, एकीने तुम्ही राहाव
राखारे प्रेम भाव, स्वर्ण संधि मिळाली ॥ १ ॥

बेडीत फिरंग्याच्या, होती ही मातृभूमि।
किती कष्ट शोषियले त्या गुलामित आम्ही ॥
आता तरी सावध व्हारे, स्वधर्म ओळखावे,
देशासाठी झिजावे, राहील इज्जत आपुली ॥ २ ॥

करू नका व्याभिचार, दुःख होतील फार।
वाढेल अत्याचार, जीवनी पडे अंधार ॥
मिळे न कुठे थार, फिराल दारोदार,
मिळे न परमेश्वर, घरी येई कंगांली ॥ ३ ॥

हे कळवळ्याचे बोल, मानू नका रे फोल।
आहेत अनमोल, हृदयात तू रे धर ॥
ही जैरामाची हाक, ऐका हो आई बाप,
मिळेल तुम्हा फळ, येणार हरियाली ॥ ४ ॥

---

## भजन क्र. ४१ (सत्य काम करता...)

चाल - चल उठ रे मुकुन्दा

---

सत्य काम करता, जरी प्राण कोणी हरला।
चिन्ता न त्याची मजला,
जरी देह माझा गेला ॥ धृ ॥

धन पुत्राचा न गर्व, मी तू पण जावो सर्व।
स्वाभिमान राहो नित्य,
त्या आत्मबल सुखाचा ॥
किती तरी येई दुःख, सोडी न जन सेवेला ॥ १ ॥

असी बुद्धि राहो देवा, दिन दुबळ्यांचा हो भला।
लागो न धूर्त वारा,
खोटे ज्ञान नको मला॥
मन माझे नित्य राहो, हरि भक्तिच्या कामाला॥ २॥

लहानपण बरे, द्वेष हे जळो सारे।
जिथे पाप चर्चा असे,
ऐकून देई तैसे॥
जन्मो जन्मीचा दास करून ठेव अपुला॥ ३॥

दृष्टि न जावो माझी, खोट्या नाट्या कामा कडे।
ऐसेच देई मला,
सत्कर्माचे ते धडे॥
जैराम हीच आस, निभवी माझ्या प्रणाला॥ ४॥

---

## भजन क्र. ४२ (कित्ती सांगू रे देवा...)

(चाल - मी डोलकर डोलकर दरियाचा राजा)

---

कित्ती सांगू रे देवा दुर्दैवाची कहानी २ ॥
आता कुठवरी विश्वास, ठेवू कुणाचा देवा ॥
कोणी दिसेना या जीवाचा विसावा ॥धृ॥

मिळती मार्गात जे जे संगी, पाडी तंगी ।
भुलवीं स्वहिताला, नेई ते मायेच्या रंगी ॥
कामी क्रोधी यांचा, काय जीवा लाभ व्हावा ॥१॥

शोधुनि पाहिले गण गोत्र आणि मित्र ।
स्वार्थापुरते प्रीत, सोडुनि पळती सूत्र ॥
बुडविणारे हे संग कैसा करावा ॥२॥

उभी आहे ओढाळ वासना, भुलवी मना ।
या पासुनि रे, कष्ट झाले नाना ।
जैराम म्हणे, तारक तूच केशवा ॥३॥

## भजन क्र. ४३ (कसौटी कुठवरी घेशील...)

(चाल - वाजवी मुरली श्याम सुंदरा)

कसौटी कुठवरी घेशील आमुची ।
थोडी दया ना तुजशी रे ॥धृ॥

रात्रं दिवस उभी चिन्ता ।
सूचत नाही रे भगवंता ॥
भांन राहिना कुण्या कामाची ॥१॥

नेत्रातून अश्रू वाहे ।
हृदयी कंप भरूनी राहे ॥
दुर्दशा झाली या जीवाची ॥२॥

सांगु मी किती केविलवाणी ।
घेई न कोणी अपुल्या ध्यानी ।
कहानी असे सुख दुःखाची ॥३॥

जैराम म्हणे दीन दयाळा ।
का बाळावरी तू रे रूसला ॥
लाज राख पामराची ॥४॥

## भजन क्र. ४४ (तुझ्या जगाची आज दशा...)

(चाल :- जो आवडतो सर्वाला)

तुझ्या जगाची आज दशा ।
बघवे ना रे जगदीशा ॥धृ॥

दिवसं दिवस नाजुक वेळ ।
कैसा रचिला तूने खेळ ॥
ईमानदारी जात आहे ऽऽऽऽ
सर्वठायी भरली ईर्ष्या ॥१॥

दया भाव ठेवी न मनीं ।
व्यवहार करती छल कपटानी ॥
घात करती जीव जीवाचा ऽऽऽऽ
अंगी मी तू पण नशा ॥२॥

मानवतेचे कर्म नाही ।
दानव झाले स्वार्था पायी ॥
विसरले ते स्वहित अपुले ऽऽऽ
धरूनी ती खोटी आशा ॥३॥

सत्य करूणा प्रेम न मनी ।
चिन्ता ग्रस्त झाले प्राणी ।
चालला सोडत निसर्ग संग ऽऽऽ
मानवता जात विनाशा ॥४॥

जैराम म्हणे तुझी कला ।
समजत नाही रे गोपाळा ॥
काय कळेल पामराला ऽऽऽऽ
सूबुद्धि दे सर्वा ही आशा ॥५॥

---

## भजन क्र. ४५ (चढली नामाची नशा...)

**(जैरामबाबाचे अनुभविलेले बोल)** (चाल :- वाजवी पावा गोविन्दा)

---

चढली नामाची नशा ।
सुटली प्रपंच आशा ॥
पाही तो एक जगदीशा ।
दीसे तो जगाला पीसा ॥धृ॥

कळे न कुणा मर्म ।
बीरला जानतसे वर्म ॥
समजे तेंव्हा जाई त्याच्या वंशा ॥१॥

अंतरी शहाणा,
प्रेरणा देई मूढजना
देव त्याने केला आपुल्या वशा ॥२॥

दुष्ट सज्जन,
पाही तो एक समान ।
ठेविना मनी कोणाची ईर्ष्या ॥३॥

विश्व त्याचे घर,
देव झाला कुटुंब परिवार ।
रमतो विदेही दशा ॥४॥

म्हणे जैराम,
सहस्त्र दळी घेतो विश्राम ।
कळेना कुणा त्याची ती भाषा ॥५॥

---

## भजन क्र. ४६ (मरना जीना माया खेल है ...)

(चाल :- ज्योत से ज्योत)

---

मरना जीना माया खेल है ।
जीव अमर अविनाशी है ॥धृ॥

सुख दुःख दोनों जीवन संगाती ।
मन विकार भोगे चौऱ्याशी ॥
वासना ये बंधन कारण है ॥१॥

काम क्रोध मोह लोभ ।
मार्ग में पहाड खडे है ।
आशा तृष्णा के बिछे काटे है ॥२॥

कर्म अकर्म तराजू के पल्ले ।
पाप पुण्य के तौल तुले ॥
सत्नाम की ये डंडी बनी है ॥३॥

तौलन हारे प्रभु बैठे है ।
सच झूठ देख रहे ॥
जैसे करे वैसे पाते है ॥४॥

इस झंझट से छूटने के लिये ।
जीवन में सत संग करले ॥
जैराम गुरू बाणी धरले ॥५॥

---

## भजन क्र. ४७ (गुरू ने मेरे हृदय पर...)

(चाल - गुरू बिन कौन उतारे पार)

---

गुरू ने मेरे हृदय पर मारा बाण,
निकल गया अभिमान ॥धृ॥

रात दिन ये निंदिया न आये
भटक रहा ये जान ॥१॥

चैन नहीं है मन में थोडी, जल बिन रहे कि जैसी मछली ।
वैसा ही मेरा हाल ॥२॥

सोवत जागत अष्ट प्रहर में,
लग गया गुरू का ध्यान ॥३॥

जिधर जाऊं उधर गुरूही दिखता, इस संसार से डर बडा लगता,
हो गया मैं हैरान ॥४॥

मृत्यु स्वर्ग पाताल लोक में, जल थल नभ तीनों ठिकान में ।
चक्र सा फिरे उनका बाण ॥५॥

घायल की गति घायल जाने, गुरू वचनों को वो पहिचाने ।
जैराम वही मेरी शान ॥६॥

## भजन क्र. ४८ (तुझ्या भेटी विन सुख...)

(चाल - सारी सारी रात तेरी याद)

तुझ्या भेटी विन सुख नाही देवा २
गोविंद माधवा कृपा करी ॥धृ॥

तू माझा चालक मी तुझा बालक
आता सहाय्य होई देवा
मन हे उदास राहे
केंव्हा भेट देई पांडूरंगा २
तुझ्या भेटी ॥१॥

माया ही मोहनी, संसार या वनी
चौऱ्याशी बंधनी टाकी तसे
काळोख अंधार दिसे मला जगी
मायाचा रोगी झालो देवा
तुझ्या भेटी ॥२॥

तुझ विन रोगी आहो या संसारी
वैद्य गा श्रीहरी येई त्वरे
तुझ्या भेटी ॥३॥

येऊनिया मज द्यावी ती औषधी ।
रोग न लागो कधी मायेचा हा ॥
जैरामदास म्हणे प्रार्थना ही तुला ।
जन्मो जन्मी मला तुझा संग ॥
तुझ्या भेटी विन ॥४॥

## भजन क्र. ४९ (भोळ्यांच्या मेळ्यात देव...)

(चाल - माळ्याच्या मळ्यामधे कोण ग)

भोळ्यांच्या मेळ्यात देव ग उभा,
भाव भक्तिची झळके प्रभा ।
विठुराया दाखवि तू निजपाया, जडजिव तारा या ॥धृ॥

धावोनिया ब्रीद सांभाळी, कामे त्यांची करी ग ऽऽऽ ।
संकट समयी भक्त जनांना, तो मार्ग दाखवी ग ऽऽऽ ॥
उभा राहोनी भक्ता पाठी, कष्ट सोशी तो जगजेठी ।
जिव्हाळा आई सांभाळी बाळा, जड जीव तारा या ॥१॥

दळण दळिले जनाबाईचे, मीरेचे विष प्याला ग ऽऽऽ ।
अर्जुनाचा होऊन सारथी, रणात विजयी केला ग ऽऽऽ ॥
गोरा भजनात रंगला, तुडवी मातीत मुलाला ।
कृपावंत करी त्यासी जीवंत, जडजिव तारा या ॥२॥

म्हणे जैराम असा दयाळू, हाक कानी घेई ग ऽऽऽ ।
मनी ज्याची जशी भावना, तैसे ठाव देई ग ऽऽऽ ॥
शरणागता तू तारिशी, ब्रीद रक्षण्या तु रे येशी ।
घननीळा कृपाकरी पामरा, जडजिव तारा या ॥३॥

## भजन क्र. ५० (करी तू इतके रे देवा...)

(चाल - प्रभू हा खेळ दुनियेचा)

करी तू इतके रे देवा, देहातून जीव निघे जेव्हा ।
मुखी तुझे नांव हे राहो, तेच मागणे केशवा ॥धृ॥

मोह न येवो मन वाणी, राहो सत्य ती वाणी ।
जरी त्रास हो किती देहां, तरी धैर्य न सुटावा ॥१॥

घडो संताचा हा संग, अहंकार न लागो अंग ।
व्यवहार लीनतेचा जडावा, हेच मागणे तुला देवा ॥२॥

नयनी दिसो सर्व जीव, तुझेच नाम चिंतनी ।
तेणे मिळे सुख शांति त्यांना, जुडे नाते सदा तुझ्या सव ॥३॥

येवो ना द्वेष कुणाचा, कुणाला कोणाच्या प्रति ।
वाढो प्रेम करूणा, एक मेका मिळुनि राहावा ॥४॥

म्हणे जैराम प्रार्थना, घेई तू आपुले कानी ।
नको मज मुक्तिचा पद, जन्मो जन्मी संग तुझा रहावा ॥५॥

---

## भजन क्र. ५१ (इथे सर्व ठाई...)

(चाल - मुझे दुनियावालो, शराबी न समझो)

---

इथे सर्व ठाई दुख दुख दिसे,
कोण दुःखिताचे अश्रू पुसे ॥धृ॥

जगी तुझ्या वाचून कोणी न सहारा,
जिकडे पाहू तिकडे तुझाच इशारा ।
तूच कर्ता हर्ता, असे विश्वाचा,
तुझ्या सत्तेवीन पान न हाले ॥१॥

जिकडे पाहू तिकडे मायेचे गुलाम,
कळे नाही तुझे यांना मर्म ।
भुलले सनमार्ग, मनी गर्व असे,
चौदिशा फिरती जसे वेडे पीसे ॥२॥

जीव जीवाचा घात करी,
अज्ञाना मुळे बनती वैरी ।
नाही स्वतःची ओळखी अन्तरी
आत्मघात करी चौऱ्याशीत फसे ॥३॥

जैरामदास म्हणे तुझ्या चरणाविन,
सुखी नाही कोणी दिसे या जगी ।
बुडत्या नावेचा तारका तूच हरी,
येवोनिया देवा देई तू दिलासा ॥४॥

## भजन क्र. ५२ (देह तुझा आहे मानवाचा...)

(चाल - जारी ओ काळी बदरीया)

देह तुझा आहे मानवाचा, कर्म असती रे दानवाचे ।
कैसे कळेल मर्म देवाचे,
भुलला मार्ग मानवतेचा ॥धृ॥

देव करून दगडाचा, देसी नैवेद्य मंदिरेचा ।
लागली मुला दीठ, घरी वैद्याची वाट ।
सांगे रोग हा भूत बाघेचा ॥१॥

लागली तुला बहुचिंता, जे लागेल देइन भगवंता ।
वाचवा आता याला, द्रव्य देईन तुला ।
पकडा पकडा जशाला तशाला ॥२॥

तुझ्या नाहीं मनी रे कीव, घेतो कोंबड्या बकऱ्यांचा जीव
बोटी हौशेने खाशी, पर दुःख न पाहशी ।
व्यवहार असा निर्दयतेचा ॥३॥

जैराम म्हणे खोट्या नीती पाई, सत्यासी ओळखिला नाही ।
मुकला राम नाम, पाप केले जमा ॥
फेरा लागला जन्म मृत्युचा ॥४॥

## भजन क्र. ५३ (कर्म अकर्माचे माप...)

(चाल - घडो तुझे दर्शन मजला)

कर्म अकर्माचे माप, आहे तुझ्या हाती ।
शोधुनि पाहे तू, आपुल्या अंतरी रे ॥धृ॥

जीव उध्दराया मानव देह हा लाभला ।
याच देही याच जन्मी, साधी हित आपुला ॥
नाही तर तुला पुढे, चौराशीची फेरी ॥१॥

जीवित राहून मरण, पाही अपुले डोळा ।
मिळवून घे तू स्वहिताचा, मुक्ति सोहळा ॥
तेव्हां तू मानव म्हणण्याचा, होशी अधिकारी ॥२॥

युग तुझे पाशी चारी, जैसे कर्म करी ।
तैसे ठायी जागा देई, तुला श्रीहरी ॥
सत्य असत्य पाहुनि, बंधन तोडी ॥३॥

जैराम म्हणे बाबा, खोवू नको वेळ ।
मिळाली ही तुला संधी, आहे अनमोल ।
जसे ध्यान मनी तुझे, स्थान प्राप्त करी रे ॥४॥

---

## भजन क्र. ५४ (लाग गड्या लाग हरी...)

(चाल - मनी नाही भाव म्हणें ऐका)

---

लाग गड्या लाग हरी भजनाशी लाग
वाईट कर्मासी आता तू त्याग रे
तेणे होईल उदय तुझे भाग्य रे ॥धृ॥

खातोरे धोका आळसाच्या पायी, कर्म अकर्म कसे न पाही ।
झाला विषयाचा भोगी, देह केला रे रोगी ।
खोट्या कामासी आता तू त्यागरे, तेणे होईल ॥१॥

आयुष्य चालले चाहडी चुगलीत ,केला जीव नाचा बारे वाटोळा ।
राम नाही नाही, ध्यान वेळ खोवितो महान ।
देवा वाचुनि नाही कोणी संगरे, तेणे होईल उदय.. ॥२॥

कोण्या जीवाची नाही तुज दया , मी तू पणी तू थाटला ।
वाटला पुण्याचारे साठा, पाप घेतले तू रे माथा ॥
मानवतेचा खोवू नको योग रे, तेणे होईल उदय... ॥३॥

जैराम म्हणे देवा वाचुनि, नाहीं कुणी ।
विचार कर क्षणो क्षणी सुख मिळे जीवनी ॥
या बोलाचा करू नको राग रे
तेणे होईल उदय तुझे भाग्य रे ... ॥४॥

## भजन क्र. ५५ (आंधळ्याच्या गायी...)

(चाल - रात्र दिन या संसारामधे)

आंधळ्याच्या गायी देव राखितो,
अहर्निशी त्यांचे कामे करितो ।
भुलोनिया देव पणाला, डोक्यावरी पाणी वाहितो ॥धृ॥

सारा भार घेवोनिया, निभवी त्यांचे ते बोल ।
पळपळ संभाळी त्यांचे बोल, होऊ न देई ते फोल ॥
दासाचे आधीन होऊनी, ब्रीद रक्षितो ॥१॥

जिकडे जाई तिकडे, उभा पंढरीचा राणा ।
अर्जुनाचा सारथी बनुनी, विजयी करी रणा ।
राहूनिया समागमे, शोभा वाढवितो ॥२॥

दळण दळिले जनाबाईचे, गोरोबाचे पोर वाचविले ।
चोख्याचे ते ओढीले ढोरे, द्रोपदीशी चीर पुरविले ॥
प्रेमाच्या वशात होऊन, शबरीचे बोरे तो खातो ॥३॥

भाव तेथे देव उभा तो, भक्ताचे आधीन ।
सोडोनिया वैकुंठ पुरी, भुवरी आले धावून
जैरामदास म्हणे रे बाबा, असा दयाळू तो ॥४॥

## भजन क्र. ५६ (कोणी मान अपमान करो...)

(चाल - बाई मी विकत घेतला श्याम)

कोणी मान अपमान करो, त्याची नाही चिंता ।
लाज शरम अर्पण केली भगवंता ॥धृ॥

आता चिंता राहिली नाही ।
सर्व सोडली देवा पाई ॥
कोणी निंदो कोणी वंदो ॥।
आम्हा हरीचा छन्द ॥१॥

माझा प्रपंचाचा हा भार ।
असे कर्णधार तो गोपाळा ।।
तोच अमुचा आईबाप ।।।
हरणारा त्रिताप ।।२।।

काम ही हा राम झाला ।
राम ही हा काम झाला ।।
जैसी संभाळी आई बाळाला ।।।
तैसी घेई करूणा ।।३।।

जैरामासी कोणी ना अंती ।
देवा चरणी मिळाली शांती ।।
विश्वास ठेवी माझ्या बोला ।।
तर्कानी काय भला ।।४।।

---

## भजन क्र. ५७ (पाहुन दुसऱ्याचे दुःख...)

(चाल - कितनी सुहानी रात कोई याद आगया)

---

पाहुन दुसऱ्याचे दुःख तुझ्या मनी सुख ।
जन्माला ना-लायक, नाही दया आणि शोक ।।धृ।।

चालतो मोठ्या डौलाने, बोलतो मोठ्या गर्वाने ।
धरसी मनी अभिमान नाही कवडीचे अंगी ज्ञान ।।
सांगतो मोठे शहाण पण लाज नाही रे ।।१।।

सोडली तूने आपुल्या वडीलांची चाल ।
लहान मोठ्याचा नाही तुला रे ख्याल ।।
शेवटी राहिलास बैलाचा बैल ।।२।।

राहसी सदा सर्व चुगली चहाडीत ।
सत्य कामात नाहीं तुझे मुळीच लक्ष ।
खोटी तू धरली रे संगत ।।३।।

खोवशील व्यर्थ श्वास नडशील या जन्मास ।
जैराम म्हणे ठेव देवाचा धाक ।।४।।

## भजन क्र. ५८ (भाव ओळखतो सर्वांचे...)

(चाल - मी राधा वृंदावनची)

भाव ओळखतो सर्वांचे ।
जैश्या रूपा बोले वाचे ॥
सत्य आणि कूट नीतिचे ॥धृ॥

येवूनि कोणी गोड गोड बोले
ठेवी अंतरी भाव निराळे ॥
कैसे फसावे त्याचे चाळे ॥
पण ज्ञान मज अंतरीचे ॥१॥

कोणी म्हणतो आहे पीसा
थट्टा छळी आणि करितो हासा ।
ओळखत नाही माझी दशा ॥
छंद लागले देवाचे ॥२॥

नाते जोडले देवा चरणी ।
सूचत नाही त्याविण कोणी ।
दिसे मला तो जागृत स्वप्नी ।
अहर्निशी भास (ध्यास) त्याचे ॥३॥

काम ही राम झाला ।
सर्वांठाई देव पाहिला ॥
गुरू कृपेने अनुभव झाला ।
जैराम मर्म जाने भाषेचे ॥४॥

## भजन क्र. ५९ (म्हणावे श्रेष्ठ कोणाला...)

(चाल - सुनो प्यारे मेरे मित्रों)

म्हणावे श्रेष्ठ कोणाला, विचारी, श्रेष्ठ जो आहे
जातीचा नीच जरी असला, कृती ने श्रेष्ठ जो आहे ॥धृ॥

ज्याला ब्रह्मबोध झाला, जड़ जीवाचा तो उद्धारक आहे
पाय धूळ लावी मी नाडी गुणाने श्रेष्ठ जो आहे ॥१॥

कर्म प्राधान्य समजोनी, कर्म निष्काम जो करतो ।
प्रिय तो वाटतो सकला, नीतिने श्रेष्ठ जो आहे ॥२॥

लोळते, लक्ष्मी पायाशी, सुखाची झोप येइल का ।
भोगतो सौख्य त्याहून ही, समाधानात ज़ो राहे ॥३॥

सुखाचा घास तया कैसा, मुखी राम ज्या नाही ।
जन्मूनी, धन्य तो होई, नेहमी राम वदताहे ॥४॥

म्हणे जैराम बाबांनो, वासना दुःख मूळ आहे ।
पुरूषोत्तम, आहे तो एक, आत्मबल श्रेष्ठ ज्या आहे ॥५॥

## भजन क्र. ६० (ठेवीशी जपून समय ज्ञान...)

(चाल - सुनो प्यारे मेरे मित्रो)

ठेवीशी जपून समय ज्ञान, जीवाचा करण्याशी उत्थान ।
मानवाची असे ही शान, प्राप्त करण्याशी तो भगवान ॥धृ॥

जन्म मृत्यु चुकायाशी, आत्मचिंतन करीत जारे ।
सोड रे सारी भ्रमणा तू, हरि विण, नाही तुजला स्थान ॥१॥

मिळाले देह किती ऐसे, सुखोन्नति नाही तू केली ।
फुकटची, गमविली संधी, मिळाला ना कुठे विश्राम ॥२॥

म्हणे जैराम आता तरी, लक्ष तू ठेव बोलाचा ।
समय जाईल हा निघूनी, पुढे लागे जन्म मरण ॥३॥

■ ■ ■

## भजन क्र. ६१ (कोण लक्षात घेतो...)

(चाल - मेरे मन की गंगा)

कोण लक्षात घेतो, कुणास काय म्हणा
काय सांगू बाबा, आला असा हा जमाना ॥धृ॥

खो, खो करूनि सोडीत बसती, सिगरेटाचे झुरके रे
चहा कॉफीचे ढोस लाविती, जणू कढीचे फुरके रे
तारूण्यामधी डगडग हालती, तरूणाच्या माना ॥१॥

हड्डी पसली मोजून घ्यावी, चालती मर्द जवान गडी
म्हाताऱ्यासम कुबल निघाले, चालती धरूनी हाती छडी
तंग चोळणे नेसूनी मारित, सिनेमाच्या ताना ॥२॥

नाट्य सिनेमा बघन्यासाठी, लागती झुंडीच्या झुंडी
एकावरती एक चढतसे, हंडीवरती जणु हंडी
नग्न स्त्रियांचे नाच पाहती, नातिन आणि नाना ॥३॥

शास्त्र पुराणे सडून राहिली, धुळ खाते भगवत्‌गीता
अश्लील गीता रचती सुधारक, पाहूनि आधुनिक सीता
ज्ञानेश्वरीचे ज्ञान, लोपले, लोपे क्षत्रिय बाणा ॥४॥

दंड बैठका आसन मुद्रा, प्राणायामाची संवय करा
राष्ट्रोन्नतिस्तव, धर्मोन्नतिस्तव, शक्ति युक्ती मेळ करा
जैरामदास म्हणे, मानवाची करा संघटना ॥५॥

## भजन क्र. ६२ (घ्यावा डिप्लोमा...)

(चाल - गुण दोष हमारे)

घ्यावा डिप्लोमा, घ्यावा डिप्लोमा
घ्यावा आत्म्याचा हा डिप्लोमा ॥धृ॥

शास्त्रांचा, तू अभ्यास केला, इंजिनिअर साहेब तू झाला ।
सीमेंट चुन्याचा मार्ग बनवि, जाशील का तू निजधामा ॥१॥

जड देहाचा, अभ्यास करशी, डॉक्टर पदवी तू रे घेशी ।
रसायनादि किती बनविशी, मृत्युनंतर ना ये कामा ॥२॥

लुडबुड लुडबुड करण्या शिकला, न्यायान्यायी वाद घातला ।
वकील म्हणवूनी जरी गाजला, यम दरबारी कुचकामी ॥३॥

आत्म्याचा डिप्लोमा घेशी, पोटाचा हा सोडून देशी ।
संत बीजाने, पुन्हा प्रगटशी, जग उद्धरण्या ये कामा ॥४॥

जैरामदास म्हणे तत्वना, आत्मानंद अरे तू असता ।
सुखदुखाची, मुळीच न बाधा, ओळख तु रे अमरात्मा ॥५॥

---

## भजन क्र. ६३ (कोणी पापी असो वा...)

(चाल - गुण दोष हमारे)

---

कोणी पापी असो वा, पुण्यवान असो
कोणाच्या जीवाला, दुखवू नये २
हा माझा खरा उपदेश असे ॥धृ॥

जो जसा असेल, त्याचे फळ, त्यास मिळे
त्यात अमुचे काय बिघडे
ज्याला ज्यात समाधान, वाटत असे ॥१॥

जैसा करेल तैसा पावेल,
त्यात आम्हाला काय नवल वाटे
ज्याचे सुख दुःख त्याचे पाशी ॥२॥

जैराम म्हणे रे बाबा,
माझ्या सर्व जीवावर प्रेम असे ।
त्यात मला, आनंद असे ॥३॥

■ ■ ■

## भजन क्र. ६४ (कधी राहतो मी...)

(चाल - गुण दोष हमारे)

कधी राहतो मी, जवान गडी
कधी घेतो मी हातात छडी ॥धृ॥

कधी कामाची रे, अति गोडी ।
कधी उदास राहूनि, दिनरात रडी ॥१॥

कधी सेवा, करण्यात घाली उडी ।
कधी सर्व जीवा प्रति, अति आवडी ॥२॥

कधी संत संगाची, जवळी झुंडी ।
कधी सतकामात मन हे अडी ॥३॥

जैराम जीवाची पोवाडी ।
तुझ वाचूनि, काही नावडी ॥४॥

## भजन क्र. ६५ (धन्य धन्य तू ग आई...)

(चाल - मोहे भुल गये सांवरिया)

धन्य धन्य तू ग आई, प्रेम पान्हा मज देई ॥धृ॥
पाहून बाळाचे कौतुक, मन होई उल्लसित ।

माझे बोबडे ते बोल, तुला वाटे मोठे नवल ॥
होऊनी प्रेमाच्या भारांत मिठी घाली गळ्या ॥१॥

ओत प्रोत प्रेम भावे, भजनी रंगे बाळा सवें ।
जयराम म्हणे धन्य आई, तिच्या चरणी माझा डोई ॥२॥

## भजन क्र. ६६ (जन्म मरण, देहाचे ते भोग...)

(चाल - सारी सारी रात तेरी)

जन्म मरण, देहाचे ते भोग
मनाला ते रोग, वासनेच्या पायी ॥धृ॥

जीव हा बंधन, अज्ञानात राही
सत्य असत्याची, ओळख नाही
म्हणोनिया दुःख, क्षणोक्षणी होई ॥१॥

कर्म इन्द्रियाचे फळ, अकर्म ठरे
रज तम सत्व जीव, द्वये नाडे
निष्काम सत्वगुण, मोक्षास नेई ॥२॥

रजा पासुनिया, माया जाळ
तमा पासुनिया, नर्का चे द्वार
परखल्याविण, जीव नाही सोडी ॥३॥

जैरामदास म्हणे, सर्वांचे सार
एक सत्वगुण, जीवाचा उध्दार
मनाचा निर्धार, आत्म्याचे ठायी ॥४॥

## भजन क्र. ६७ (रामकृष्ण हरि, जीवाचा कैवारी...)

(चाल - रघुपति राघव गजरी गजरी)

रामकृष्ण हरि, जीवाचा कैवारी, जपा ऽऽ निरंतरी ॥धृ॥

प्राणी जगे जन्म मृत्यु टाळी, ब्रह्मपदाचा होय अधिकारी
घ्यावया अनुभव अंतरी, बळकट भाव जो नित्य धरी ॥१॥

प्राण अपना सोऽहम् सूत्रे, जीवा बसावे भक्ति पात्रे
मेरू मंडळाची सीढी करूनि, जावे शुन्यादि शून्यान्तरी ॥२॥

काया वाचा मनसा पासूनि, ह्यानी ह्याला साक्ष ठेवूनि
लक्ष अलक्षी जावे ठिकाणी, जाण्याला त्या अमर पुरी ॥३॥

जैराम म्हणे माळा रात्रं दिनी, फिरे एकवीस हजार सहासे स्वासी
जो न परखे, खुंटे यम फॉसी..
तोच निर्वाण पद अधिकारी ॥४॥

## भजन क्र. ६८ (काय सांगू या रामा...)

(चाल - मी डोलकर डोलकर दरियाचा राजा)

काय सांगू या रामा, प्रपंचाची ही मात
झालो, जर्जर जर्जर, जीवनी पडला फास
रात्रं दिवस, मन राहे उदास ऽऽ ॥धृ॥

ह्या प्रपंचाचे पाई, भुललो देवा
सदोदीत काम, जीवा नाही विसावा
चैन नाही मनी, दुःख सांगू कोणास ॥१॥

बिकट काम क्रोध पाहाड, उभे आहे
पार होणे यासी, मार्ग सुचत नाही
आशा तृष्णेचे, काटे देती त्रास ॥२॥

ओढाळ वासना नेई, पाप डोही
अनमोल संधि, व्यर्थ वाया जाई
जन्म घेऊनी, भुललो स्वहितास ॥३॥

जैराम म्हणे आलो, भेटी जग जेठी
माया लागली रे, आमचे ती पाठी
घेवू मुखी नाम, सुटका तेव्हा जीवास ॥४॥

## भजन क्र. ६९ (भाव भक्तिची एकी करा...)

(चाल - माळ्या च्या मळ्या मधे कोण ग उभा)

भाव भक्तिची एकी करा, गुरूला तुम्ही ह्रदयी धरा
उध्दरण्या द्वेष भाव विसरा, तारण्या जीवाला ॥धृ॥

भाव बळकट धरूनीया, नाम सुमरण करी ग ऽऽ
जड देहाचे भान विसरूनि, ठाई ठाई हरि पाही ग ऽऽ
कल्प विकल्प सोडोनिया, निजस्वरूप पाहवया,
मनाला, आत्मसमर्पण करा, तारण्या जीवाला ॥१॥

गगन मंडळी लक्ष लावूनि, अलक्षी मिळूनि जावे ग ऽऽ
अंत-रंग जगात जावोनि, अमृत नित्य प्यावे ग ऽऽ
पिवूनिया तृप्त होई, त्या नशेत मग्न राही
ते सुख, ते सुख, कोठे नाही, तारण्या जीवाला ॥२॥

जैराम म्हणे ही अनुभवी खूण, गुरूने दिली पटवून ऽऽ
देव दाविला, माझ्या देही, संशय गेला निघून ऽऽ
बोलता चालता माझा मीच, विश्वाला पाही आपुल्यात
तुटले ऽ जन्म मृत्यु बंधन, शरणी जा संताला ॥३॥

॥ जय मानव - जय लहरी ॥

■ ■ ■

